# आरती संग्रह

**।। श्रीदेवी रेणुके । वंदन करितों तुजला ।।**

श्रीदेवी रेणुके । वंदन करितों तुजला । दे सन्मती आतां सेवा करण्या मजला ।।धृ।।

किती दैत्य मारुनी सुरवर तूं तोषविले । अवतार घेऊनी भूधर तूं रक्षीयले ।।चाल।।

घेई धांव आतां तू देवी रेणुके । कितीःअंत पाहसी आई ।अंबिके ।।

प्रार्थना करी मी माते तव चरणाला । सन्मती देऊनी रक्षी दीन जनांला ।। श्रीदेवी०।।१।।

तसे शुंभ निशुंभा मोक्षपदां त्वां नेलें । एकवीरा म्हणवुनी भृगुकुल भूषविलें ।।

पाठीशीं राहुनी रक्षी परशुरामाला । तशि झणी प्रगटुनी तारी भारताला ।। चाल ।।

करुं किती अतां मी धांवा चंडिके । झणिं पाव भवानी माते भाविके ।।

तव प्रसन्न करण्या करितों मी पूजेला । ती गोड मानुनी रक्षी बालकाला ।। श्रीदेवी रेणुके ।।२।।

**।। आरती करितों भार्गव तुजला ।।**

आरती करितों भार्गव तुजला । तारी सत्वर या दीनाला ।।धृ।।

लीन सदोदित तव चरणाला। सुमति द्यावी या दासाला ।।

नारद तुंबर तव सेवेला । गायन करिती ताल सुराला ।।१।।

भक्तां अभक्तां सुखकर गमला । महिमा गातां भूधर श्रमला ।।

यति ब्रह्मेंद्र तुम्ही उध्दारिला । आज कठिण आम्हांवरी झाला ।।२।।

चातक पाहुनी मेघ उतरला । धांवत यावें या ठायाला ।

आस कुणाची करुं दातारा । संकट कालीं कवणा धारा ।। आरती करितों ।।३।।

**।। आरती करुंया भावें श्रीरामाची ।।**

आरती करुंया भावें श्रीरामाची । रेणूकातनय भृगुकुलदीपकाची ।।धृ।।

रणिं क्रुर दैत्य मारुनी विप्रकूळाची । राखिली लाज ही पूर्णकृपा भक्ताची ।।चाल ।।

सप्रेम निरंतर ध्याती माधवा । सारासार विचार काही मानवा ।।

संचार दुःसह भारी मानवा । पापें दग्ध होऊनी जाती जन्मांतरिचीं ।।
तवकृपा झालिया जातिल ते मोक्षसी ।।१।। आरती करुंया ०।।
मतिमंद परी मी सेवा तव चरणाची । करण्यास लाभली इच्छाही मम मनिची।।चाल।।
झणिं धांव आतां तू देवा भार्गवा । अज्ञान हरोनी द्यावी सन्मतिची ।
ही आस धरोनी सेवा करी भक्तिची ।।२।। आरती करुंया ०।।

**।। आरती गजवदनाची ।।**

गजवदना ही आरती तुजला । करितो भावे तारी दिनाला ।।धृ।।
सारेगमपधनी सा, ग, री, सप्तसुर । धुम किट धुम किट म्रुदंग ध्वनी हा ।।१।।
गजवदन ही आरती तुजला । तकथै तकथै तैथु करिसी । आनंदी भरुनी जाय सुराला ।।२।।
गजवदना ही आरती तुजला ।।

**।। आरती जगदंबे ।।**

आरती जगदंबे तुज अंबे तारक विश्वकुटुंबे जय जय जगदंबे
प्रथम मुळारंभा घटशोभा तोरण मखरस्तंभा
दुसरे दिनी पुजा तुज ओजा ओवाळीन सुखकाजा
लोकत्रय धंदा आनंदी ध्याती मानस वृंदा
चवथे दिनी पुजा तुज ओजा ओवाळीन सुखकाजा
पंचारती पाही तुज आई सुंदर अंबाबाई
षडदुण संपन्न अन्नपुर्णा देसी मंगल सदना
सप्तेश्वर मेळी रसबाळी नाना वाद्यरसाळी
भावबळे आका घनदाटे उधार मुळपिठे
नवदिनी नवरात्र शिवस्तोत्र स्थापिती मंगलमंत्र
दास तुझा ध्याई अंबाई कुलदैवत मुळमाई
आरती जगदंबे तुज अंबे तारक विश्वकुटुंबे

**।। आरती त्रिभुवन सुंदराची ।।**

आरती त्रिगुण रुपाची । करावी मनोभावें साची ।।धृ।।
वाम भागीं रुद्र वसे । ब्रह्या सव्य दिशे विलसे ।
मध्यें भृगुविर विष्णु असे । मूर्ति फारच रम्य दिसे ।
भाविक नंदादिप देती । कोणी संतर्पण करिती ।। चाल ।।
तारक जगतास, महेंद्रीवास करितसे खास राममूर्ति । घडामोड करित जगताची ।
कृपा करि भक्तां रक्षिण्याची ।। आरती त्रिगुण रुपाची ।।१।।
कुलपरंपरा वीरश्रीची । केली गति कुंठित सूर्याची ।
प्रार्थना करुनी ऋषीची । इच्छा करीत आज्ञेची ।।
अर्पुन छत्र चामरासी । गेला निघून स्वर्गासी ।। ।।चाल।।
त्रिभुवनीं किर्ति, जग संरक्षिति, पातकें जळती, अपेक्षा नसे मुळीं ज्याची ।
कामना पुरवी भक्ताची ।। आरती त्रिगुण रुपाची ।।२।।
गोजिरें रुप भार्गवाचें । श्याम तनु पीतांबर साजे ।
देणें अढळ देवाचें । पुरविलें कोड ब्राह्मणाचें ।
सागर -गर्व - हरण करुनी । केली निःक्षत्रिय अवनी ।। चाल।।
परमपूज्य, देई साम्राज्य, बाणकरी सज्य, थोर किर्ती ज्याची ।।
विठ्ठल सेवा करि त्याची ।। आरती त्रिगुण रुपाची ।।३।।

**।। आरती परशुरामा । पूर्ण मंगलधाम ।।**

आरती परशुरामा । पूर्ण मंगलधाम ।।धृ।। आरती परशुरामा ।।
निराकार रुप तुझें । येई पहातां प्रेमा ।।
पाळ पंजर दैत्य । प्रवल काल कामा ।।१।। आरती परशुरामा ०।।
देवगण खिन्न झाले । करील कोण क्षेमा ।।
करिती प्रार्थना तुज भार्गवरामा ।।२।। आरती परशुरामा ०।।
निर्दाळूनी दवंडीसी । तयाला निजधामा ।।
सुखी करा सर्व जन दावूनीयां निजप्रेमा ।।३।। आरती परशुरामा ।।

**।। आरती परशूधराला ।।**

आरती परशूधराला । करण्या मनोभावें त्याला ।।धृ।।

चलाहो मंदिरीं पूजेला । तोची सुखविल जगताला ।।

द्यावें आसन तयाला । पद तें दिधलें ध्रुवाला ।।१।। आरती ।।

पाद्य आणि अर्ध्य आचमन तथा तें पंचामृत स्नान ।।

घालोनी मांगलिक स्नान । करितो अभिषेक पूर्ण ।।२।। आरती ।।

वस्त्र गंध अलंकार । पुष्पें माळा गळां भार ।।

दावुनी धूप दीपाला अर्पुनी महानैवेद्याला ।।३।। आरती ।।

नारळ विडाही अर्पून । कर्पूर आरती करून ।।

प्रदक्षणाहि घालून । नमन साष्टांग करुनी ।।४।। आरती ।।

वेद मंत्रासी म्हणून । तोषला देवासी भजून ।

प्रार्थना करीन मी त्याला । दयानिघे द्याहो सन्मतिला ।।५।। आरती ।।

**।। आरती भार्गवरामाची ।।**

आरती भर्गवरामाची । नौका भवार्ण विश्वाची ।।धृ।।

राक्षस ते नृप रुपानें । छळिती जनास अवमानें।।

नाशिती यज्ञ स्व-कराने ग्राशिती भूमिस भारानें ।।

म्हणूनी रेणुके उदरी येई । त्रेतीं जनन हरी नेई ।।चाल ।।

माधव मास शुक्ल पक्षास तृतीया खास पहावाटे । नाम घे दिवस निशीं वाचे ।।१।।

आरती भार्गवरामाची ।।धृ।।

कान्ती जाम्बूनद समती । रविकर निस्तेजची पडती ।

पदलांछन हययावरती । उधळी पिवळी सुंदर ती ।।

ऊरु कदलासम असती जंघा तृणीसम दिसती ।।चाल ।।

सुशोभित माळ, नेत्र सुविशाल नास, नीढळ सुकीळाची । मोहि मन प्रभा आननाची ।।२।।

आरती भार्गवरामाची ।।धृ।।

मस्तकी जटाबंध विलसे । मनगटी अक्षसमूह वसे ।।

पृष्ठी हरिणार्जन साजे । हेमोपवीत रुळतसे ।।

कंठी तैसी माळ धरी । पीतांबर हि कटिक वरी ।। चाल ।।

चतुर्भुज ज्यास बाण चापस परशु अभयास धरित ज्याची स्तुती करी नारायण प्रभुची ।।३।।
आरती भार्गवरामाची ।।धृ।।

**।। काल काम परशुराम आरती तुला ।।**

काल काम परशुराम आरती तुला । करितों मी प्रेमाने तारितूं मला ।।धृ।।
त्रेतायुगीं विप्रकुळी जन्म घेतला । मारुनियां क्षत्रियांसी धर्म रक्षिला ।।
महेंद्र -गिरीं शिखरीं सदा येऊनी बैसलां । चाल ।।
देवा, धांवा , पावा, अघहरणा, मनरमणा, जोडितों करा ।।१।। काल काम परशुराम ०।।
पीतांबर कमरेला वरतीं मेखला । वैजयन्ती हार गळा शेला घेतला ।।
चतुर्भूज मूर्ती रम्य परश शोभला ।। चाल ।।
देवा घ्यावी सेवा, अघहरणा, मनरमणा, जोडितों करा ।।२ ।। काल काम परशुराम ०।।
मनकामना पूर्ण करी विनवितों तुला । सदाचारी लोक वसो नित्य भूतला ।।
द्‌वैतभाव दूर सरो भक्त वत्सला । चाल ।।
देवा, वारासारा त्रिविध ताप, माय-बाप, जोडितों करां ।।३।। काल काम परशुराम ०।।

**।। जय जय जय जमदग्निज भृगुकुल कुमुद विधो ।।**

जय जय जय जमदग्निज भृगुकुल कुमुद विधो । अवलोकय नीरांजनमगणित गुणसिंधो ।।धृ।।
पितुर पराध विधायिनी है ह्या भूमिपतौ ।। आवहता क्रुधमाचिराद भवता यदिह मतौ ।
क्षितिर क्षत्रिय निवहाऽक्रिय तेयं समितौ । तत्रहि पार्श्चसहायौ स्वभुजावेव मतौ । जय० ।। १।।
काभिभजनो वा क तपः कच संगरवार्ता । कदया करिवधूनां क्षितिरार्तरवार्ता ।।
युक्तं तदपि यदासि किल नृपमदहर्ता ।।जय ०।। २।।
इष्टं नाना योगेः पर्यटिना च रसा । दत्ता च दक्षिणायै ऋत्विगभ्यस्तरसा ।।
इत्यखिलाच कृतिस्ते भगवान्नह सुरसा । तद्‌वमनो नमति शुभपद युगुलंशिरसा ।।जय०।।3।।

**।। जय जय दीन दयाळा सखया परशूधर देवा ।।**

जय जय दीन दयाळा सखया परशूधर देवा । हीन दीन मी आरती करितों घ्यावी मम सेवा ।।धृ।।
त्रेतायुगीं जन्मुनी प्रभुजी मुनीस तोषविलें ।। चतुर्वेद षटशास्त्रें शिकुनी मृगकुल भूषविलें ।।

महान तप आचरुनी शिवासी प्रसन्न त्वां केलें । शस्त्र-अस्त्र विद्येला भार्गवा, आत्मसात केलें ।।१।। जय जय०।।

जमदग्नीची धेनु न्यावया सहस्त्रार्जुन आला । धेनु जाईना म्हणुनी तयानें जमदग्नी वधिला । पतिसी रक्षण्या रेणुकेनें प्रतिबंध केला ।। रायें एक्वीस वाणें घायालकेलें रेणुकेला ।।२।। जय जय ०।।

राजमदानें रायें ऋषींचे आश्रम जाळियेले । धेनू ब्राह्मण आणि अबला यांसी त्रशियलें ।। याकारणे देवा, सहावे अवतारा धरिंलें । परशु हातीं धारण करुनी रायासी वधिलें ।।३।। जय जय दीन दयाळा०।।

**।। जयदेव जयदेव जय मंगलधामा ।।**

जयदेव जयदेव जय मंगलधामा । भांवे भजतो तुजला दे सौख्य रामा ।।धृ।।
तव ध्यानें मन माझें मोहित बहु झालें । म्हणुनी मन मोहन तुजला नाम शोभलें ।।
भगवन्नामामृत प्राशन पै केलें । करुणा करि देवा मज सार्थक हें गमलें ।।१।। जयदेव ०।।
देवा तूं बा केले अगणित उपकार । सकल जगताचा झाला तूंची आधार ।
निजभक्ताचा माथां तूं घेशी भार ।। ऐशी करुणा तूझी देवा, अपार ।।२।। जयदेव ०।।
अर्पीली काया अवघीही तूते । पातकी आहें परंतु उध्दरी मातें ।।
शिशु हारीं पडता रक्षावें मातें । सांभाळी तूं धरुनी निजभक्तां हाते ।।३।। जयदेव ०।।
आनंदाचा सतत दिन ऐसा यावा । मग आम्ही प्रेमानें करुं या उत्सवा ।।
दयानिधे तो तुम्ही मान्य करावा हीच प्रार्थना बा तुजपाशी देवा ।।४।। जयदेव ०।।

**।। जयदेवा जयदेवा जय परशुरामा ।।**

जमदग्नी कुमार म्हणती भृगवीरा । दुष्ट क्षत्रिय मारुनी हरीसी भूभारा ।।
आदी -अतं - मध्य नाही तुज वीरा । भक्ता दर्शन देण्या धरिसी अवतारा ।।१।।
जयदेवा जयदेवा जय परशुरामा । आरती ओवाळूं परिपूर्ण कामा ।।धृ।। जयदेवा जयदेवा ।।
पीतांबर धर सुंदर वपुः श्रीवदना । ब्रह्म-रुद्रादीक वंदिती तव चरणा ।
सर्वांगी तुळशी शोभती भवहरणा । कंठी अक्षमाळा स्वानंद सदना ।।२।। जयदेवा ०।।
आधी मत्स्य होऊनी मनुला रक्षियला । कूर्मरुपें पृष्ठी मंदलाचल धरिला ।

सूकर रुपें हिराण्यक्ष मारीलां । प्रल्हादास्तव आपण स्तंभी अवतरला ।।३।। जयदेवा ०।।
वामन रुपें बळीला पाताळीं नेला । चिंरजीव होऊनी महेंद्री राहीला ।।
रघुकुळी येऊनी रावण मारीला । कृष्णरुपें यदुकुळीं यादव रक्षीला ।।४।। जयदेवा०।।
कलियुगीं अवतार बौध्दाचा धरिला । पंढरपुरी राहूनी पंढरी जाहला ।
कलिचा अवतार घेसी सुरवरा । धर्म रक्षूनीया शोभसी तूं बरा ।।५।। जयदेवा ०।।

## ।। त्र्यंबकेश्वराची आरती ।।

जय जय त्र्यंबकराजा गिरिजा नाथा गंगाधरा हो ।
त्रिशुल पाणी शंभो नील ग्रीवा शशिशेखरा हो ।
वृषभारूढ फणिभूषण दशभूज पंचानन शंकरा हो ।
विभूतिमाला जटा सुंदर गजचर्मांबरधरा हो ।।धृ।।

पडले गोहत्येचे पातक गौतमऋषींच्या शिरी हो ।
त्याने तप मांडिले ध्याना आणुनि तुज अंतरी हो ।
प्रसन्न होऊनि त्याने स्नाना दिधली गोदावरी हो ।
औंदुबरीमुळी प्रगटे पावन त्रैलोक्याते करी हो ।।१।।

धन्य कुशावर्ताचा महिमा वाचे वर्णू मी किती हो ।
आणिकही बहूतीर्थे गंगा द्वारकादिक पर्वती हो ।
वंदन मार्जन करिती त्यांचे दोष महा नासती हो ।
तुझिया दर्शन मात्रे प्राणी मुक्तिते पावती हो ।।२।।

ब्रम्हगिरीची भावे ज्याला भक्ती प्रदक्षिणा घडे हो ।
तें तें काया कष्टे जव जव चरणी रुपती खडे हो ।
तव तव पुण्य विशेष किल्मि अवघे त्यांचे झडे हो ।
केवळ तो शिवरुपी काळ त्यांच्या पाया पडे हो ।।३।।

लावूनिया निजभजनी सकलही पूरविसी मनकामना हो ।
संतीत संपती देसी अंर्ती चुकीवसी यमयातना हो ।
शिव शिव नाम जपता वाटे आनंद माझ्या मना हो ।
गोसावी नंदन विसरे संसार यातना हो ।।४।।

## ।। नवरात्राची आरती ।।

अश्विनशुध्द पक्षी अंबा बैसली सिंहासनी हो । प्रतिपदे पासुन घटस्थापना ती करुनी हो ।
मुलमंत्र जप करुनी भोवते रक्षक ठेवुनी हो । ब्रह्मा, विष्णु, रुद्र आईचे पुजन करीती हो ।
उदोकारे गर्जती काय महिमा वर्णु तिचा हो ।।१।।
द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनी हो । सकला मधे श्रेष्ठ परशुरामाची जननी हो ।
कस्तुरी मळवट भांगी शेंदुर भरुनि हो । उदोकारे गर्जती सकळ चामुंडा मिळुनी हो ।।२।।
तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो । मळवट पातळ चोळी कंठी हार मुक्ताफळा हो ।
कंठीची पदके कासे पितांबर पिवळा हो। अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लिला हो ।।3।।
चतुर्थीचे दिवशी विश्वव्यापक जननी हो । उपासका पाहती अंबे प्रसन्न अंतःकरणी हो ।
पूर्ण कृपे तारिसी जगन्माते मनमोहिनी हो । भक्तांच्या माऊली सुर ते येती लोटांगणी हो ।।४।।
पंचमीचे दिवशी वृत ते उपांग ललिता हो । अर्घ्यपाद्य पुजने तुजला भवानी स्तविती हो ।
रात्रीचे समयी करिती जागरण हरिकथा हो । आनंदे प्रेम ते आले सदभावे क्रिडता हो ।।५।।
षष्ठीचे दिवशी भक्ता आनंद वर्तला हो । घेऊनी दिवट्या हस्ती हर्ष गोंधळ घातला हो ।
कवडी अर्पिता देसी हार मुक्ताफळा हो । जोगवा मागता प्रसन्न झाली भक्तकृपा हो ।।६।।
सप्तमीचे दिवशी सप्तशृंग गडावरी हो । तेथे तु नांदसी भोवती पुष्पे नानापरी हो ।
जाई-जुई, शेवंती पुजा रेखियली बरवी हो । भक्त संकटी पडता झेलुनी घेसी वरचेवरी हो ।।७।।
अष्टमीचे दिवशी अष्टभुजा नारायणी हो । सह्याद्री पर्वती पाहिली उभी जगज्जननी हो ।
मन माझे मोहिले शरण आलो तुजलागोनी हो । स्तनपान देऊनी सुखी केले अतःकरणी हो ।।८।।
नवमीचे दिवशी नवसाचे पारणे हो । सप्तशती जप होमहवने सद-भक्ती करुनी हो।
षडरस अन्ने नैवेद्यासी अर्पियली भोजनी हो। आचार्यि ब्राह्मणआ तृप्त केले कृपे करुनी हो ।।९।।
दशमीचे दिवशी अंबा निघे सिमोल्लंघनी हो । सिंहारुढ करि दारुण शस्त्रे अंबेत्वा घेऊनी हो ।
शुंभनिशुंभा परी राक्षसा किती मारिसी रणी हो । विप्रा रामदासा आश्रय दिधला तो चरणी हो ।।१०।।

## ।। नीरांजन आरती सदैव ही तुला ।।

नीरांजन आरती सदैव ही तुला । भव-डोही बुडतों अतां ठाव दे मला ।।धृ।।
वैशाख शुध्द तृतीयेला बाळ जन्मला । रेणुकेनें आनंदे अंकी घेतला ।।
उपनयन करुनी सांगवेद पढविला । ब्रह्मचर्य पाहुनियां मुनी तोषला ।।१।।
शस्त्रास्त्रें घेऊनिया खेळ खेळला । गहिंवरला त्रिपुरांतक परशही दिला ।।
सज्ज चाप करूनी रणधीर जाहला । परशुराम अद्यापी नाम पावला ।।२।।
निजभक्तां उध्दरण्यासाठीं तो आला । स्थापुनियां धर्म सप्तऋषी जाहला ।।

पाप सापहरण करी शीघ्र पामरा । धांव घेई मिळवि आतां चिरकीर्तिला ।।३।।

**।। भार्गवरामाची आरती ।।**

जमदग्नीकुळभूषण मुक्ताफळदशना । अतिसज्जन मनमोहन रजनीकर वदना ।।
अगणित महिमा तूझा न कळे सुरगणां । वदतो कंठी वाणी सरसीरूहनयना ।।१।।
जय राम श्रीराम जय भार्गवरामा । नीरांजन करुं तुजला परिपूर्णकामा ।।
जय राम ।।धृ।।
सह्याद्रिगीरीशिखरीं शर घेऊनि येसी । सोडुनी शर पळवीसी पश्चिमेजलधीसी ।।
तुजसम रणधीर जगीं न पडे दृष्टीसी । प्रताप थोर तूझा नकळे कवणासी ।।२।। जय राम ०।।
तव कोप बहू पापी बाणें संहारी । दानवदहन करुनी वससी गिरिशिखरी।
क्षत्रिय मारूनि अवनी केली निर्वैरी । सात्विक, राजस, तामस त्रिगुणा उध्दरी ।।३।। जय राम ०।।
दृढभावें तव वन्दन करिती जे तव चरणी । त्यातें भवभय नाही जोवर शशितरणी ।
शर मारुनि उद-भविली गंगा जनतरणी । चिन्तामणि शरणागत निश्चित तव चरणी ।।४।। जय राम ०।।

**माझी रेणुका माऊली**

माझी रेणुका माऊली , कल्पवृक्षाची साऊली ।।धृ।।
जशी वत्सालागी गाय, तैसी अनाथांची माय ।।१।।
हाके सरशी घाई घाई, वेगे धावतसे पायी ।।२।।
आली तापल्या उन्हात नाही आळस मनात ।।३।।
खाली बस घे आराम, मुखांवरी आली घाम ।।४।।
विष्णुदास आदराने, वारा घाली पदराने ।।५।।
माझी रेणुका माऊली , कल्पवृक्षाची साऊली।।धृ।।

**।। माहुर गडावरी ।।**

माहुर गडावरी ग तुझा वास ।

भक्त येतील दर्शनास ।।धृ।।
पिवळ पातळ ग पातळ बुट्टेदार ।
अंगी चोळीना हिरवीगार ।
पितांबराची ग बराची खोवुनी कास ।
बिंदी बिजवरा ग भाळी शोभे ।
पाक माळ्याने वेल झुबके ।
पट्टा सोनेरी ग सोनेरी कमरेला ।
सरी ठुशी ना ग मोहनमाळ ।
जोडे मासोळ्या पैंजणचाळ ।
हि-याच्या नथीला ग नथीला हिरे घोस
जाई जुईच्या ग आणिली फुले ।
भक्त गुंफिती हार-तुरे ।
हार घालिते ग घालिते अंबिकेला
पुरणपोळी ग घालिते भोजनाला ।
मुखी तांबुल देते तुला ।
ओटी भरिते ग भरीते नारळाची ।
माझ्या मनाची ग मानस पुजा ।
प्रेमे अर्पिती अष्टभुजा ।
मन भावेने ग भावेने पुजिते तुला

**।। रेणुकेची आरती ।।**

श्री देवी रेणुके वंदन करीते तुजला
दे सन्मती आता सेवा करण्या मजला ।।धृ।।
किती दैत्य मारुनि सुखर तु तोषविले
अवतार घेऊनी भूधर तु रक्षियले
घे धाव आता तु देवी रेणुके
किती अंत पाहसी आई अंबिके
प्रार्थना करी मी माते तव चरणाला
सन्मती देऊनी रक्षी दिन जनाला ।।१।।
तसे शुंभनिशुंभा मोक्षपदात्वा नेले
एकविर म्हणवुनी भृगकुल भूषविले

पाठीशी राहुनी रक्षी परशुरामाला
तशी झणी प्रगटुनी तारी भारताला
करु किती आता मी धावा चंडिके
झणी पाव भवानी माते भविके
तव प्रसन्न करण्या करिते मी पुजेला
ती गोड मानुनी रक्षी बालकाला ।।२।।

**।। विघ्नांतक विघ्नेशा ।।**

विघ्नांतक विघ्नेशा आरती तुला ।
करितो मी प्रेमभावे तारी तु मला ।।
अहंभाव जाणुनी तव शरण पदाला ।
आलो मी एकदंत देई मुक्तिला ।।
गिरीजांकी बसुनि तिला दाविती लिला ।
शंकर ही प्रेमभावे पाहती लिला ।।
वक्रतुंड गजवदना स्तवितसे तुला ।
देसी तया मुक्ति तशी देई तु मला ।।
रक्ताक्षन रक्तपुष्पे पुजितात तुला ।
दुर्वांकुर अतिसुंदर शोभती तुला ।।
धुप दीप लावुनिया करु मी आरतीला ।
सुख दुःख विसरुनिया आलो मी भक्तीला ।।
संकष्टी व्रत करुनि पूजिती तुला ।
भक्तांचा भाव बघुनि घेई पुजेला ।।
निजभक्ता उद्धरण्यासाठी तो आला।
प्रार्थितसे गजवदना दावी किर्तीला ।।

**।। विश्‍वेशा भार्गवाला ।।**

विश्‍वेशा भार्गवाला ओवाळूं आरती । कार्तवीर्य- नाशका ही ऐका विनंती ।।धृ।।
त्रय तापें गांजले जन करि दूर विपत्ती ।।१।। विश्‍वेशा भार्गवाला ०।।
भार्येसह चित्ररथाला पाहोनी विमानीं । उभी राहे गंगातीरी रेणूका भुलोनी ।

व्यभिचारी जाणोनीयां जमदग्नी कोपती ।। जमदग्नी कोपती ।।२।। विश्वेशा भार्गवाला ०।।
वध माता काल कामा निर्भय होऊनी । माया- पाश दुःसह पडले मूर्छा येऊनी ।।
ऋषी आज्ञा वंदुनीया तिघां वधसी श्रीपती ।। तिघां वधसी श्रीपती ।।३।। विश्वेशा भार्गवाला ०।।
संतुष्ट झालों रामा हें धैर्य पाहोनी । वर माग इच्छासी जो देईन त्वरित मी ।।
माता बंधू सजिव होवो वधाची विस्मृती । वधाची विस्मृती ।।४।। विश्वेशा भार्गवाला ०।।
उणें काय ईश्वरा तूं प्राण्यांना रक्षिसी । वाढवाय ब्रह्मतेज मजलागीं विनविसी ।
सफल होती मनोरथ तथास्तु म्हणसी । तथास्तु म्हणसी ।। ५ ।। विश्वेशा भार्गवाला ० ।।

**।। हे माते जगदंबे आरती तुला ।।**

हे माते जगदंबे आरती तुला । भक्ताभिमानीं होई उध्दरी कुला ।।धृ।।
उध्वस्त सकल लोक महिष मातला । विकट रुप धरुनी भू भार हरिला ।।१।। ।।धृ।।
नाजुक तनु खड्ग चाप हाती घेतला । पितांबर भरजरीवर पट्ट शोभला ।।२।। ।।धृ।।
नृत्यसदा सुरगणही पदकमला । करीती गान गंधर्व देव सेवेला ।।३।। ।।धृ।।
आरक्त नयन भाळी कुंकुम टिळा । चंद्र सूर्य लोपती नभी मुर्ति सोज्वळा ।।४।। ।।धृ।।
नवरात्री पाठ करुनी पुजिती तुला । भक्ताने तोषवुनी मोक्षही दिला ।।५।। ।।धृ।।

**।। होते आरती जगपालाला ।।**

होते आरती जगपालाला ।
जन्मुनि द्‌विजकुळी सुखवी सकला ।।
ध्यान धरोनि स्तब्ध बैसला ।
पालन करण्या सिध्द जाहला ।।
परशुचाप शोभे हस्ताला ।
पाहूनि वाटे मज कालाला ।।१।।
भारत वर्षी हा अवतरला ।
योगामधे पूर्ण जाहला ।।
वरदहस्त ठेवूनि शिकविला ।
गंगे चरणी कृतार्थ झाला ।।२।।
स्वत्वरजस्तम मूर्ती बनला ।

एक रामरुपी मनी ठसला ।
जा मनुजा त्यांचे सेवेला
तारी सत्वर या दिनाला ।।